निं. दि. दा. क्र. ४२९/२०१९
केशरबाई व इतर वि. नंदाबाई व इतर
निशाणी क्रमांक १३८ खाली

**वादीतर्फे साक्षीदार क्र.०२**
**शपथेवर सांगतो की,**

**माझे नाव** – डॉ.शैलेश सुधाकर चांदजकर,
**वय** – ४८ वर्षे,
**व्यवसाय** – हस्ताक्षर तज्ञ
**राहणार** – कल्याण, जि.ठाणे.

**साक्षीदाराचा सरतपास वादींतर्फे विधीज्ञ श्री.पी.पी.कुलकर्णी यांचेमार्फत.**

०१. माझे शिक्षण पी.जी.डी. (Post Graduate Diploma in Criminology and Forensic Science) क्रिमीनोलॉजी ॲण्ड फॉरेन्सिक सायन्स असे झाले आहे. सदरची पदवी मी अन्नामलाई विद्यापीठ, चेन्नई येथून प्राप्त केली आहे. हस्ताक्षर तज्ञ म्हणून मला २५ वर्षांचा अनुभव आहे. मी यापूर्वी वेगवेगळ्या न्यायालयामध्ये तज्ञ म्हणून साक्ष दिली आहे. दस्त क्र.१९९९/१९९७ तपासणीकरीता माझ्याकडे प्राप्त झाला होता. सदर दस्तावरील हस्ताक्षर तपासण्याकरीता खरेदीखत दि.१८.०४.१९७२ रोजीचे सोबत देण्यात आले होते. दोन्ही दस्तांवरील भाऊराव भोसले यांच्या सह्यांचे मी फोटो घेतले. परिक्षणानंतर मला दोन्ही दस्तांवरील भाऊराव भोसले यांच्या सहीमध्ये फरक आढळून आला. दोन्ही सह्या वेगवेगळ्या व्यक्तिंचे आहे असे निष्कर्षास आले. सदर सह्यांचे परिक्षण करुन अहवाल दिला. आता मला अहवाल दाखविला असता तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व

बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१३९** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास प्रतिवादी क्र.७ तर्फे विधीज्ञ श्री.एम.जी.भाले यांचेमार्फत.**

०२. मी २५ वर्षांमध्ये शेकडो हस्ताक्षरांचे निरीक्षण केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दस्तावरील हस्ताक्षराचे निरीक्षण करावयाचे आहे तो दस्त मुळ असणे गरजेचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, एखाद्या दस्ताची प्रत पाठविली असल्यास अशा प्रतीवरुन अभिप्राय देता येत नाही.

०३. माझे पूर्ण शिक्षण एम.एल., एल.एल.बी., पी.एच.डी. व पी.जी.डी. (Post Graduate Diploma in Criminology and Forensic Science) क्रिमीनोलॉजी ॲण्ड फॉरेन्सिक सायन्स असे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पडताळणीसाठी पाठविलेला दस्त मी आज रोजी सोबत आणला नाही. दस्तावरील हस्ताक्षर पडताळणीची मागणी कोणी केली त्याचे नाव सांगता येणार नाही. सदरची मागणी एका स्त्री ने केली अथवा पुरुषाने केली हे सांगता येणार नाही. दस्त तपासणीकरीता अर्ज दिला होता अथवा नाही ते सध्या सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्ज करणाऱ्याने वादातील दस्त कोणता आहे व मान्य असलेला दस्त कोणता आहे हे व्यक्तिश: सांगितले होते. हे मला सांगता येणार नाही की, दस्त क्र.८३९/१९७२

(नि.क्र.१२९) मध्ये पहिल्या पानावर फक्त सही असे लिहून त्यासमोर नाव लिहिलेले आहे व सदर व्यक्तिची सही केलेली नाही. हे मला सांगता येणार नाही की, सन १९९० पूर्वी झालेल्या फक्त मुळ दस्तांवर लिहून देणार–घेणार यांची सही घेतली जात होती. हस्ताक्षर तपासणीकरीता सन १९९९ सालच्या एकाच खरेदीखताची प्रत आम्हाला देण्यात आली होती.

०४. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाच्या आदेशाशिवाय आम्हाला कोणत्याही दस्ताची पडताळणी करण्याचा अधिकार नाही. मी कार्यालयीन अभिलेख जतन करतो. सदर दस्ताची पडताळणी केली त्या संदर्भात संबंधित पक्षकाराकडून फी जमा केल्याची पावती दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९७२ च्या दस्तावरील हस्ताक्षराची पडताळणी करण्याकरीता दस्त आमच्याकडे कधीही आला नव्हता. हे मला सांगता येणार नाही की, सन १९७२ च्या दस्तावर भाऊराव मुकूंदराव भोसले यांची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९७२ च्या दस्तावर भाऊराव मुकूंदराव असे नमूद असून सही असा शब्द लिहिलेला आहे, सदर नावाला सही आहे असे गृहित धरुन मी खोटा अहवाल दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९९ सालच्या खरेदीखतावर भाऊराव मुकूंदराव भोसले यांची खरी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्ज करणाऱ्यासोबत संगनमत करुन कोणतेही निरीक्षण न करता खोटा

अहवाल दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरीत/–
(सी.म.पाडोळीकर)
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
जालना.

जालना
दिनांक: ११.०८.२०२५